# : प्रस्तावना :

कामेरी गावातील शेतमजुरांची आर्थिक पहाणी या अभ्यास विषयाची एम्.फीलसाठी खूप काळजीपूर्वक व विचारपुर्वक निवड केली आहे. कारण मी सुध्दा एका शेतक-याचाच मुलगा असल्यामुळे जेव्हा पासून शेतमजुरांकडे पहाण्याच्या दृष्टीकोनामध्ये वैचारिकता आली - तेंव्हापासूनच शेतमजुरांची रहाणी, परिस्थीती, मजुरी, त्यांची आर्थिक ओढाताण, त्यांची जेवणाची स्थिती, घरची परिस्थीती या सर्वांची जवळून पहाणी केल्यामुळे त्यांच्या जीवनाबद्दल उत्सुकता होती. अशा शेतमजुरांच्या आर्थिक परिस्थितीची पहाणी करण्याच्या हेतूने हा अभ्यास विषय निवडलेला आहे. ज्या देशाची शेती मागासलेली आहे, ज्या शेतीचे यांत्रिकीकरण झालेले नाही अशा शेतीच्या उत्पादनामध्ये महत्वाचा असणारा घटक " शेतमजूर " या शेतमजुरांची परिस्थीती मी एका शेतक-याचा मुलगा असल्याने जवळून पाहिली होती म्हणून हा विषय अभ्यासासाठी निवडलेला आहे.

कामेरी गाव एक खेडेवजा असणारे गाव, जे अशा, - खेड्याखेड्यानी एकसंघ बनलेल्या भारताचा एक घटक आहे. त्या गावातील शेतमजुरांचा अभ्यास म्हणजे सर्व शेतमजुरांचा अभ्यास केल्याप्रमाणेच आहे म्हणून शेतमजुरांच्या आर्थिक परिस्थितीची सखोल पहाणी करण्यासाठी एक प्रातिनीधिक घटक म्हणून कामेरी गावाची निवड केली.

त्याच बरोबर कामेरी हे माझे जन्मगाव आहे. मी कामेरी गावचा स्थायी रहिवाशी आहे. शेतमजुरांच्या ओळखी असल्यामुळे कोणताही आडअडचा न ठेवता शेतमजुरांकडून विना अडचण मनमोकळेपणाने माहिती गोळा करणे शक्य होते. म्हणून शेतमजुरांच्या आर्थिक -

.....ब/-

परीस्थीतीची पहाणी करण्यासाठी प्रातिनिधीक घटक म्हणून कामेरी गावाची निवड केलेली आहे.

कामेरी गावातील शेतमजुरांच्या आर्थीक परीस्थातीची पहाणी करत असता कामेरी गावातील शेतमजुरांचे मोलाचे सहकार्य लाभले त्याबद्दल प्रथम त्यांचे आभार मानणे आगत्याचे आहे.

श्री शिव-शाहू महाविद्यालय सरुड,चे स्फुर्तीस्थान,संस्थेचे अध्यक्ष मा.माजी आमदार बाबासाहेब पाटील,सहचिटणीस गणपतराव घोरात यांची प्रेरणा व सहाय्य अनमोल आहे. तसेच कॉलेजचे प्रभारी प्राचार्य इक्बाल तांबोळी सर; अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा.शिवाजी साळुंखे सर - प्रा. आप्पासाहेब देसाई, प्रा. मारुती पाटील, प्रा.रामलिंग नाळे,प्रा.शंकर जाधव, प्रा. हणमंत पवार, प्रा. दिनकर लाहिगडे, प्रा. गणपती कांबळे, प्रा.बाळासाहेब पाटील, प्रा. वसंत पाटील, प्रा.विवेकानंद जाधव इतर प्राध्यापक, वरिष्ट लेखानिक तानाजी पाटील,शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मदत केली आहे.

कामेरी गावातील प्रा. अनिल पाटील,प्रा. दिलीप पाटील - प्रा. सुभाष जाधव, श्री. आनंदा पाटील, श्री. शामशुद्दीन संदे, श्री. सुर्यकांत पाटील, श्री. प्रदिप पाटील, श्री. निवास मदने, श्री.राजेश मदने, श्री. आयनुद्दीन तांबोळी, श्री. शशिकांत नांगरे, श्री. रमेश जाधव, श्री. सदाशिव पाटील, इ. मित्र मंडळी, तसेच कामेरी ग्रामपंचायत सरपंच, सदस्य, ग्रामसेवक जयवंत जांभळे, तलाठी वसंत यादव, श्री.दावीद आढाव, लेखानिक मंडळी श्री. आयुब मगदुम, श्री. बबन स्वामी, वाळवा तालुका पंचायत समितीतील लेखानिक मंडळी, महाराष्ट्र राज्य सांख्यिकी विभाग, कोल्हापूरमधील लेखानिक श्री.कुंभार, कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज उरुण-इस्लामपूरचे प्राचार्य विश्वास सायनाकर, ग्रंथपाल श्री. सज्जन पाटील,

.....क/-

टंकलेखक श्री· दानशूर पाटील, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय उरुण-इस्लामपूरचे ग्रंथपाल दिलीप पाटील, तानाजी पाटील व सेवकवर्ग यांची बहुमोल साथ मिळाली·

सरुड गावातील माझ्यावर मुलाप्रमाणे प्रेमाचा वर्षाव करणारे सुखदु:खात आधार देणारे कै· आण्णा, ती·आईसाहेब, दादा, - तात्या, बापू, तसेच सर्व वहिनींनी माझ्यावर अपार ममता करुन मार्गदर्शन केले· त्यांच्या प्रेमाच्या,ममतेच्या ऋणातून मुक्त होणे अशक्य आहे·

त्याचबरोबर महात्मा फुले विद्यालयाचे शिक्षक व उरुण - इस्लामपूर नगरपरिषद सदस्य मेहरबान बबनराव अनंत पाटील यांनीही वेळोवेळी योग्य मार्गदर्शन व अनमोल सहाय्य केले आहे· त्यांचा तसेच - काळमवाडीचे सावंत कुटुंबियांचे आभार न मानणे कृतघ्न पणाचेच ठरेल·

माझे आराध्य दैवत माझे आई वडील (आण्णा) यांनी मला जीवनाचा हा मार्ग दाखवला त्यांचे,माझे बंधू दादा,भाऊ,अरुण, माझे दाजी-बहिणी त्यांच्या मार्गदर्शनाने व प्रेरणेने मी हे सर्व करु शकलो·

माझ्या शोधप्रबंधाचे मार्गदर्शक डॉ· सुरेंद्र भानुशाली व त्यांच्या सुविध्य पत्नी सौ· सिमा भानुशाली (माई) या उभयतांचे योग्य मार्गदर्शन,बहुमोल सहकार्य व अनमोल मदत याबद्दल मी त्यांचा शतश: ऋणी आहे·

त्याचबरोबर माझ्या या कार्यात मला प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मदत करणा-या व्यक्तींचा नामोल्लेख मी अज्ञानाने विसरुन गेलो असेन त्या सर्वाचा मी ऋणी आहे·

सरतेशेवटी माझी धर्मपत्नी सौ·सुवर्णा पाटील जीणे आपल्या सुखाचा त्याग करुन माझ्या या कार्यात अनमोल मदत केली· तीच्या आभारा शिवाय हे ऋणनिर्देश अपूर्णच वाटत होते ते त्यांचेही आभार मानून पूर्ण करतो·

. . . . .